# ''दुर्बल घटकांच्या सबलीकरणा करिता फुले,शाहू आणि बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान''

डॉ. माया बापूराव मसराम
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
शरदराव पवार कला व वाणिज्य महा. गडचांदूर
ता. कोरपणा जि. चंद्रपूर

पुरोगामी महाराष्ट्र घडविण्यात सर्वांत महत्वाचा वाटा असणारे फुले, शाहू, आंबेडकर हे होय. या तीनही महापुरुषांनी आपापल्या कार्य काळात समाजासाठी, राज्यासाठी आणि देशासाठी भरभरून योगदान दिले आहे. त्यांनी आपल्या क्रांतीकारी विचारातून समाजाला सुधारण्याचे महत्वाचे पाऊल उचलले. त्यांच्या विचारातूनच आजचा समाज परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करीत आहे. महाराष्ट्राची आजची प्रागती आणि उदारमतवादी प्रतिमा या विचारवंताणी घडवीली असे म्हणायला काही हरकत नाही. महात्मा फुले, आणि बाबासाहेब आंबेडकर यांनी मोठया प्रमाणात लेखन केले. त्यांच्या लेखनीतून आजचा समाज उभा आहे. दुर्भल घटकांच्या विचारात न्याय, स्वातंत्र्य व समानतेची बिजे रोबणारे महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासहोब आंबेडकर हे महान क्रांतीकारक होय. अनेक वर्षापासून गुलामीत जीवन जगणारा, उच्च वर्णीयांकडून न्याय, स्वातंष्य, समतेची संध्दी, अधिकार व कर्तव्यापासून दुर ठेवण्यात आलेला समुदाय म्हणजेच दुर्बल घटक होय. सामाजिक, राजकिय, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक अधिकारापासून वंचित असलेला समुदाय म्हणजे, अनुसूचित जाती – जमाती, भटक्या जाती –जमाती, इतर मागास वर्ग ह्या सर्व घटकांना अनेक वर्षापासून गुलामीचे चटके सहन करावे लागले. या तिनही महापुरुषांनी स्वातंत्र्य, समता, न्याय व बंध्दुत्वाची जाणिव करुण देवून या दुर्बल घटकांना सन्मानाने जीवन जगण्यास शिकविले.

अस्पश्य दिन दुबळया समजल्या जाणाऱ्या बहूजन समाजातील शुद्रांदी शुद्रांना शिक्षणाची दारे खुली करून देणारा महामानव महात्मा जोतीबा फुले यांचे प्रथम नाव घ्यावे लागेल. स्त्रीयांना समाजात कुठलेच स्थान नव्हते. तीला पशू सारखी वागणूक दिल्या जात होती. स्त्रियांच्या उध्दारासाठी महात्मा फुले यांनी प्रथम मुलींची शाळा काढून आधूनिक स्त्रि शिक्षणाचे जनकत्व मिळविले. भारतीय दुभल घटक, स्त्रियांच्या अधिकार आणि हक्क मिळवून देणारे, शेतकरी व कामगारांची दुःख आणि दारिद्रय निवारण्यासाठी चळवळ उभारणारा पुढारी, जाती संस्थेवर हल्ला चढवून मानवी समानतेची घोषना करणारा पहिला लोक नेता, सामान्य जनतेच्या दुःखाला वाचा फोडून न्याय देणारा महात्मा म्हणजे जोतीबा गोंविदराव फुले होय. महात्मा फुलेच्या काळात समाजात कमालीची विषमता होती. प्रत्येक व्यक्ती आपल्या जाती विरोधी कोणतेही वर्तण करण्याची हिम्मत करीत नव्हता. शुद्र जातीच्या लोकांना सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकिय अधिकारापासून वंचित ठेवल्या जात होते. लोक देखील मुखाटयाने आपले भाग्य नशिब म्हणून हे सर्व सहन करीत होते. या सर्वांचे कारण म्हणजे अज्ञान होते. हे महात्मा फुले यांनी ओळखले होते. या सनातन लोकांविरुध्द क्रांतीचे पहीले पाऊल म्हणून 1848 मध्ये पूण्यातील बुधवार पेठेतील भिडेवाडयात मुलींची पहिली शाळा काढली. या शाळेत शिकविण्यासाठी महीला शिक्षिका मिळत नव्हती. म्हणून ज्योतीबाने आपल्या पत्नीला साक्षर करून त्या शाळेत मुलींना शिकविण्या करिता पाठविले. मुलींना शिक्षण देण्याचे क्रांतीकारी विचार सर्वप्रथम महात्मा फुलेंनी केला. त्यासाठी अनेक समस्यांना त्यांना सामोरे जावे लागले. इतकेच नव्हे तर अनेक गरिब मुलींना शिक्षणाचे दारे खुली करून दिले.

शिक्षण हे मानवाची मुलभूत गरज आहे. शिक्षणाने मानवात परिवर्तन होते. मनाला चांगले काय? आणि वाईट काय? या गोष्टीची जाणिव शिक्षणाने होते. शिक्षणानेच सामाजिक परिवर्तन घडून येते. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही असे ज्योतीबांना वाटत होते. शिक्षण सर्वांनाच मिळाले पाहीजे, मोफत व सक्तीच्या शिक्षणाची त्यांनी इंग्रज सरकारकडे मागणी केली होती. आज ज्योतीबाच्या शिक्षणाचे परिणाम म्हणून दुर्बल घडकांच्या वाटयाला सुखाचे दिवस आल्याचे दिसून येते. दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी महात्मा फुलेंनी विधवा महिलांचे पुनर्विवाह घडवून आणण्याचा प्रयत्न केला. 1964 मध्ये शेणवी विधूरांचा पुनर्विवाह घडवून आणला आणि विधवांनाही जीवन जगण्याचा अधिकार मिळवून दिला. शिक्षणासोबतच त्यांना शेतकऱ्याच्या समस्या सोडविण्यासाठी ''शेतकऱ्यांचा आसूड'' हा ग्रंथ लिहून शेतकऱ्याचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. धर्म, प्रशासन यांच्या चक्रव्युह मध्ये पोळून निघालेल्या शेतकऱ्यांना हा निबंध वाचून, समाजावून, सांगून त्यांच्यात जगण्याची व प्रतिकाराची नवी हीम्मत त्यांनी निर्माण केली. ''विद्ये विना मती गेली, मती

विना निती गेली, निती विना गती गेली, गती विना वित्त गेले, वित्ता विना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले''. अशा प्रकारे मानवी जीवनाच्या परिवर्तनाचे, विकासाचे मुळ शिक्षण हेच आहे. ज्याच्या जवळ विद्या नाही, ते आपले अधिकार आणि हक्क या विषयी जागृत होणार नाही. ज्योतीबा फुले यांनी दुष्काळात अस्पृश्यांना आपल्या घरची पाण्याची विहीर पिण्याचे पाणी भरण्यासाठी उपलब्ध करून दिली. महात्मा फुल्यांना धर्मातील श्रेष्ठ, कनिष्ठ अशा प्रकारचे भेदभाव मान्य नव्हते. मानवाचा खरा धर्म म्हणजे, 'मानसात मानुसकी असली पाहीजे' असे त्यांना नेहमी वाटत होते. हजारो वर्षापासून धर्माच्या नावावर सर्व सामान्य जनतेची लुटमार, अन्याय, अत्याचार होत होता. त्याचा अनुभव त्यांनी घेतला होता. म्हणून त्यांनी एकेश्वर वादाचा पुरस्कार केला आणि 24 सप्टेंबर 1863 ला 'सत्यशोधक समाजाची स्थापना केली'' शेतकऱ्यांना न्याय हक्क मिळावा म्हणून अनेक चळवळी उभारल्या. गरीब, दलित, शोषीत समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुश्य पनाला लावले.

दुर्बल घटकांच्या विकासासाठी जसे फुले यांनी आपले संपूर्ण आयुष्य घालवीले, त्या प्रमाणे दुर्बल घटकांसाठी शाहू महाराजांचे योगदानही महत्वपूर्ण आहे. मागास जातीच्या लोकांना शिक्षणाची संध्दी मिळावी त्यांना शिक्षण घेता यावे. म्हणून शहरात वस्तीगृहाची सोय करून दिली. शहरात राहण्याची सोय नसल्याने अनेक गरिब लोक शिक्षण घेवू शकत नव्हते. तसेच शहरात शिक्षण घेण्यासाठी जातांना अनेक अडचणीचा सामना करावा लागत होता. अशावेळी शाहू महाराजांनी कोल्हापूरात 1896 मध्ये सर्व जाती धर्मांच्या विद्यार्थ्यांकरिता एकत्र राहता यावे म्हणून बोर्डींग काढले. त्यात विद्यार्थ्यांना राहण्याची व जेवणाची सोय उपलब्ध करून दिली. परंतू ज्याच्याकडे हे काम सोपविले होते. त्यांनी तिन वर्षात ब्राम्हण जाती व्यतिरिक्त इतर जातिचा एकही विद्यार्थी घेतला नाही. हे पाहून शाहू महाराजांनी वेगवेगळया जातीच्या मुलांसाठी वेगवेगळे वस्तीगृह काढण्याचे ठरविले. त्यांनी एकुण 10 वस्तीगृह सुरू केले. त्यात सर्वच जातीच्या मुलांना राहण्याची सोय उपलब्ध करून दिली. त्यामुळे इतर जाती–जमातीच्या मुलांना शिक्षण मिळाले. शिक्षणासोबत मुलांना व्यवसायीक शिक्षण देण्यावरही राजर्षी शाहू महाराजांनी भर दिला. तसेच आपल्या संस्थानात मागास वर्गीयांसाठी 50 टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या. दुष्काळाच्या वेळी शेतीला कर्ज देण्याकडे महाराजांनी विषेश लक्ष दिले होते. संस्थांनाच्या ट्रेझरी मध्ये जे वेगवेगळे निधी ठेवण्यात आले होते. त्यातुन 26768 रुपये कर्जावू म्हणून दिले. 1906 ते 1907 च्या अहवालात अशी नोंद आहे की, 12500 रुपये तगाई म्हणून जनतेला वाटले. शाहू महारांजाना गरिब, रंजले व गांजलेल्या लोकांप्रती अफाट प्रेम होते. थोडी देखील लोकांना अडचण आल्यास शाहू महाराजांकडे धावून जात असे. त्यावेळी शाहू महाराज त्या लोकांना मदत करीत असत. ते एक दयाळू राजे होते. महाराष्ट्राचा सामाजिक चेहरामोहरा बदलविण्यासाठी जीवाचे राण करणारे तेजस्वी महापुरूष म्हणजे शाहू महाराज होय.

शाहू आपल्या युरोप मधल्या दौऱ्यात विज्ञानाने घडवून आणलेली मौलीक प्रगती, आधूनिक उद्योगधंदे, शेती सुधारणा, सिंचन व्यवस्था पाहून प्रभावित झाले. आणि त्यांनी मनाशी एक गाठ बांधली की, समाजाच्या उन्नतीसाठी सर्वांना शिक्षण मिळाले पाहीजे. शिक्षणाशिवाय समाज प्रगती करू शकणार नाही. म्हणून शाहू महाराजांनी बहूजनांकरिता आरक्षण आणि वस्तीगृहाची सोय उपलब्ध करून दिली. समाज संमृध्द व बलवण करण्यासाठी त्यांना उत्तम शेतकरी, उत्तम व्यापारी, उत्तम उद्योगपती, उत्तम सौनिक निर्माण व्हावे लागले. आणि ते निर्माण होण्याचा एकमेव मार्ग महाराजांना दिसत होता. आणि तो म्हणजे मागास वर्गीय व दलीत शोषीत समाज घटकांमध्ये शिक्षणाचा प्रसार करणे ही गोष्ट शाहू महाराजांनी महत्वाची मानली होती. सामाजिक विषमता आणि धार्मिक अनिष्ठ रुढिंना शुद्र व अतिशुद्र यांच्या प्रमाणे सर्वच वर्गातील स्त्रियांचाही बळी जात आहे. याची जाणिव शाहू महाराजांनाही झाली होती. ही जानिव सर्व प्रथम ज्योतीबा फुले नंतर शाहू महाराजांना झाली. सामाजिक विषमतेचा बळी शाहू महाराजांना व्हावे लागले होते. तेव्हांच त्यांच्या मनात विचार आले मी राजा असतांना देखील ही विषमता पाडली जाते. मग सर्वसामान्य जनता यांचे काय? असा प्रश्न त्यांना पडला होता. म्हणून त्यांनी सामाजिक परिवर्तणाच्या दिशेने आपले पाऊल टाकले होते.

दुर्बल घटकांच्या सबलीकरणासाठी महात्मा फुले, शाहू महाराजा नंतर बाबासाहेब आंबेडकरांनी वंचित शोषित घटकांच्या विविध समस्या लक्षात घेवून त्या सोडविण्यासाठी जीवाचे राण केले. भारतीय प्रशासनात लोकशाही शासन प्रस्थापित करण्यासाठी सामाजिक क्रांती आवश्यक आहे हे बाबासाहेबांनी ओळखले होते. म्हणून त्यांनी अगोदर सामाजिक परिवर्तन घडवून आनन्यासाठी अथक परिश्रम घेतले. बाबासाहेबांनी सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक विषमतेचा जवळून अनुभव घेतला. त्यांना शिक्षण घेतांना अनेक अडचणीचा सामना करावा लागला. उच्च शिक्षण घेतल्यानंतरही ते ज्या ठिकाणी शिक्षण देण्यासाठी जात होते. त्या ठिकाणी त्यांना एक प्राध्यापक म्हणून योग्य वागणूक दिल्या जात नव्हती. म्हणून बाबासाहेबांनी सामाजिक परिवर्तनाचा ध्यास उदाशी बाळगून अनेक प्रकारचे लिखान केले. ज्या देशात मानसामानसात उच्च निच्चतः हा भेद मानला जातो. ज्या

देशात व्यक्तीची किंमत त्याच्या जाती वरून व जन्मावरून ठरते. त्या देशात लोकाशाही शासन टिकणे फार कठीन आहे. त्यासाठी आपणास राजकीय लोकशाही टिकवायची असेल तर सामाजिक लोकशाही बळकट करणे आवश्यक आहे. सामाजिक लोकशाही म्हणजे नागरीकांनी आचरणात आणणे आवश्यक आहे. या देशात शुद्र आणि अतीशुद्र यांचे सबलीकरण घडवून आणण्यासाठी हिंदू धर्माचा कणा समजल्या जाणारी चार्तुवर्ण्य व्यवस्था सर्वांत प्रथम नष्ट करावी लागेल. जातीभेद नष्ट करायचे असेल तर ज्या धर्मग्रंथात भेदभाव सांगीतला असेल अशी धर्मग्रंथे नष्ट करणे आवश्यक आहे. म्हणून बाबासाहेबांनी 25 डिसेंबर 1926 ला मनुस्मृतीचे दहन करून तमाम बहूजनांना त्यांचा हक्क आणि अधिकाराची दारे उघडी करून दिली. मनुस्मृतीने येथिल शुद्र आणि अतिशुद्र लोकांना सर्व अधिकारापासून वंचित ठेवले होते. इतकेच नव्हे तर अस्पृश्यतेची संकल्पना निर्माण करून अस्पृश्य जातीच्या लोकांचे शारिरीक, मानसिक शोषण मोठया प्रमाणात केले जात होते. त्यांना एक मानव म्हणून समाजात कोणतेही स्थान नव्हते. परंतू बाबासाहेबांच्या अथक प्रयत्नातून अस्पृश्य जातीच्या लोकांच्या जीवनात फार महत्वपूर्ण बदल पहायला मिळतो आज भारतीय समाजात महीलांना जो समानतेचा दर्जा मिळाला तो खऱ्या अर्थाने बाबासाहेबंचीच देण आहे तमाम कष्टकरी कामगार शेतकरी, स्त्रिचा, अनुसूचित जाती–जमाती, मागास वर्ग यांच्यासाठी विविध कलमांच्या माध्यमातून घटनेमध्ये आरक्षणाची तरतुद केली आहे. आज आम्ही न्याय हक्कांचा जो लढा लढतो. ती लढण्याची ताकद समाजातील सर्व वर्गामध्ये कोणी निर्माण केली. ती बाबासाहेबांनी केली आहे.

भारतीय महीलांसाठी बाबासाहेबांनी हिंदू कोडबिल लिहीले. त्यात त्यांनी स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे आरक्षण दिले. पण आमच्या सनातनी लोकांनी मात्र बाबासाहेबानी तयार केलेला हिंदू कोडबिल मंजूर केला नाही. परंतू बाबासाहेबांनी हार मानले नाही. त्यांनी घटनेमध्ये स्त्रियांसाठी समानतेचा अधिकार हे मुल्य बहाल केले. निसर्ग निर्मीत वस्तुवर सर्वांचा समान अधिकार आहे. त्या हक्कापासून अस्पृश्यांना वंचित करणे म्हणजे त्याचे मानुसपण नाकारणे होय. हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सिंध्द केले. आणि त्यासाठी त्यांनी चौदार तळयाचा सत्याग्रह, नाशिकचे काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह, पूण्याचे पर्वणी मंदिर सत्याग्रह अशा अनेक प्रकारच्या सामाजिक न्यायासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सत्याग्रहाच्या मार्गाने भारतीय दुर्बल घटकांना न्याय मिळवून दिला. त्यासाठी त्यांनी स्वातंत्र्य, समता, बंधूत्वतः, न्याय, दुर्बल घटकांना मिळावा म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक आंदोलने केले. बाबासाहेबांचा लढा कुण्या व्यक्ती विरोध किंवा समाजा विरुध्द नव्हता तर तो व्यक्तीच्या विकृत मनोवृत्ती विरोध्द व सामाजातील अनिष्ठ चालीरिती, प्रथा, परंपरा, वर्णव्यवस्था, जाती व्यवस्थे विरूध्द होता.

भारतीय दुर्बल घटकांच्या सबलीकरणासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर लंडनमध्ये जावून गोलमेज परिषदेमध्ये अस्पृश्य समाजाला निवडणूकीत उभे राहता यावे यासाठी स्वंतत्र मतदार संघाची मागणी केली व ती मंजूरही झाली. परंतू 1932 च्या पूणेकराराने त्यांच्या या प्रयत्नावर पाणी सोडले. अस्पृश्यांच्या सामाजिक विकासासाठी आंदोलन उभे राहावे म्हणून बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना केली. 1945 मध्ये पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून 20 जुन 1946 ला सिध्दार्थ महाविद्याल व औरंगाबाद मधील मिलींद महाविद्यालयाची स्थापना करून अस्पृश्य व दुर्बल घटकातील मुलांच्या उच्च शिक्षणाची दारे उघडी करून दिली. दुर्बल घटकांचे सबलीकरण घडवून आणण्यासाठी त्यांना शिक्षण मिळाले पाहीजे. त्यासाठी आरक्षणाची तरतुद घटनेमध्ये डॉ. बाबासाहेबांनी करून ठेवली. शिक्षणाशिवाय कोणत्याही समाजाचा उध्दार होवू शकत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात शिक्षण हे वागिणीचे दुध आहे. जो कोणी प्राशन करेल तो गुरगूरल्याशिवाय राहणार नाही. अशा मौलीक संदेश डॉ. बाबासाहेब यांनी सर्व दुर्बल घटकांना दिला. म्हणूनच फुले, शाहू, आंबेडकर हे दुर्बल घटकांचे कैवारी मानले जाते.

*संदर्भ ग्रंथ –*


1. *अभिजात समाजशास्त्रीय विचार, डॉ. प्रदिप आगलाव, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर*
2. *शेतक–याचे आसूड, महात्मा ज्योतीराव फुले*
3. *डॉ. भिमजी आंबेडकर खंड 3, खैरमोडे चांगदेव भगवंतराव, सुगावा प्रकाशन पूणे, 3 आवृत्ती*
4. *भारतीय समाजक्रांतीचे जनक महात्मा ज्योतीराव फुल, प्रा. पवार ना.ग., वरोरकर अविनास,पद्मगंधा प्रकाशन 2004*
5. *जाती भेद व त्यांचे निर्मूलन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, नेहा प्रकाशन नागपूर 17*